# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.07.2025** **वारःशनिवार**

---

1. पाच देशांच्या दौऱ्याच्या तिसऱ्या टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अर्जेंटिनामध्ये दाखल
2. पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते अनावरण
3. भारतीय खेळण्यांची 153 देशांमध्ये निर्यात-उद्योगमंत्री पियुष गोयल
4. 2025 च्या ग्रँड चेस टूरच्या रॅपिड सेक्शनच्या अंतिम फेरीत भारतीय बुद्धीबळपटू डी गुकेश ठरला जेतेपदाचा मानकरी आणि
5. अँडरसन-तेंडुलकर चषक स्पर्धेतल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवस अखेर भारताकडं 244 धावांची आघाडी

**<u>पंतप्रधान-अर्जेंटिना</u>**

घाना, त्रिनिनाद आणि टोबॅगो या  देशांचा यशस्वी दौरा संपवून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनोस आयर्स इथं पोहोचले आहेत. ग्लोबल साऊथशी भारताचे संबंध अधिक दृढ करणं हा या भेटीचा उद्देश आहे. या भेटीमुळे धोरणात्मक भागीदारी मजबूत होऊन सहकार्याचे नवीन मार्ग खुले होतील अशी अपेक्षा आहे. अर्जेंटिनाचे स्वातंत्र्यसैनिक आणि राष्ट्रीय नायक जनरल जोसे डी सॅन मार्टिन यांच्या पुतळ्याला पंतप्रधान मोदी आज संध्याकाळी आदरांजली वाहतील. त्यानंतर, पंतप्रधान मोदी अर्जेंटिनाचे राष्ट्रपती जेविअर मिलेइ यांनाही भेटणार आहेत या दौऱ्यात पंतप्रधान मोदी प्रसिद्ध फुटबॉल स्टेडियमलाही भेट देणार आहेत. अर्जेंटिनाच्या भेटीनंतर पंतप्रधान मोदी रिओ दि जानेरो इथं 6 आणि 7 जुलै ला होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझिलला रवाना होतील. या शिखर परिषदेत ते ब्राझील चे अध्यक्ष आणि इतर जागतिक नेत्यांची भेट घेतील, तसंच सर्व उद्योजकांशी आणि उद्योग तज्ञांशीही पंतप्रधान मोदी संवाद साधतील. त्यानंतर दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात मोदी नामिबियाला भेट देणार आहेत.

**<u>पंतप्रधान त्रिनिनाद</u>**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या दोन दिवसांच्या दौऱ्याची सांगता काल झाली. तत्पूर्वी त्यांनी तिथल्या संसदेच्या रेड हाऊसमध्ये भाषण केलं. लोकशाही ही भारतासाठी केवळ एक राजकीय व्यवस्था नसुन ती जीवनशैली असल्याचं मोदी म्हणाले. दहशतवादा विरोधातला लढा मजबुत करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी जागतिक समुदायाला केलं. त्यानंतर मोदी यांनी त्रिनिनाद आणि टोबॅगोच्या पंतप्रधान कमला प्रसाद बिसेसर यांच्याशी विविध मुद्यांवर विस्तृत चर्चा केली. चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी पायाभूत सुविधा आणि औषधनिर्माण यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी सहा करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या राष्ट्रपतींचीही भेट घेतली.

**<u>शहा</u>**

देश परदेशातील युद्धकौशल्यातील अभ्यासू सेनानींनी थोरले बाजीराव पेशवे यांच्या युद्ध कौशल्याचा गौरव केला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल पुण्यात केलं. संपूर्ण विश्वात प्रत्येक क्षेत्रात आपला भारत देश पुढे राहील यासाठीची प्रेरणा आणि ऊर्जा थोरले बाजीराव पेशवे यांच्या जीवनचरित्रातून मिळते, असं ते म्हणाले. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. गुलामीचं निशाण जिथं आहे ते उध्वस्त करुन स्वातंत्र्याचा दीप लावण्याचं काम बाजीराव पेशव्यांनी यशस्वीपणे केलं असं सांगून ते म्हणाले....

**एनडीए पुणे की एकेडमी जहां से आने वाले समय के देश की तीनों सेनाओं के सूत्रधार जहां प्रशिक्षित होकर निकलते हैं वहां बाजीराव पेशवा की मूर्ति लगना और श्रीमंत बाजीराव के मूर्ति से प्रेरणा लेकर अगर हमारे भविष्य के सेनानी जा हैं तो मुझे विश्वास है कि कई सालों तक भारत की सीमाओं को कोई छूने का साहस नहीं कर सकते। युद्ध की कला के कुछ नियम जो होते हैं वो कालबाह्य नहीं होते हैं। वो एनल होते हैं। युद्ध में व्यूह रचना का महत्व, युद्ध में त्वरा का महत्व युद्ध में समर्पण का भाव। युद्ध में देशभक्ति का भाव और सबसे बड़ी बात युद्ध में बलिदान का भाव वही सेनाओं को विजय दिलाता है और अगर ये सभी गुणों का सबसे उत्कृष्ट उदाहरण पाँच सौ साल के भारतीय इतिहास में कहीं पर ढूंढना है वो केवल श्रीमंत बाजीराव पेशवा में ही मिल सकता।**

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर शाह यांनी एनडीए च्या छात्रांशी संवाद साधला.

**गुजराती समाज शहा**

पुणे गुजराती समाजाच्या वतीनं बनवण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स आणि कन्वेंशन सेंटरचं उद्घाटन तसंच पुण्यातल्या पीएचआरसी लाइफस्पेस हेल्थ सिटीचं भूमिपूजनही काल केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते झालं.

**खेळणी निर्यात**

देशाच्या खेळणी उद्योगाचा विस्तार झाला असून सध्या जगभरातल्या 153 देशांमध्ये भारतीय खेळणी निर्यात केली जात आहे, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीत आयोजित 16 व्या टॉय बिझ इंटरनॅशनल बी2बी एक्स्पो 2025 च्या कार्यक्रमात बोलत होते. नाविन्यपूर्ण खेळण्यांच्या संकल्पना विकसित करणाऱ्या स्टार्टअप्सना प्रधानमंत्री मुद्रा योजनेचं पाठबळ मिळालं असून खेळण्यांच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी, देशभरातील 18 खेळण्यांच्या क्लस्टर्सना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयानं प्रोत्साहन दिलं आहे,असंही गोयल  यांनी सांगितलं.

**मराठी भाषा-फडणवीस**

महाराष्ट्रात मराठीचा अभिमान बाळगणं हे अजिबात चुकीचं नाही. पण, भाषेच्या मुद्द्यावरून कुणालाही मारहाण करणं चुकीचं आहे. अशा प्रकारच्या कृत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**पालखी**

महाराष्ट्रात उद्या आषाढी एकादशीचा उत्सव साजरा होणार आहे. आषाढी यात्रेसाठी पंढरपूर इथं लाखो वारकरी दाखल झाले असून पंढरपूरचा परिसर टाळ मृदुंगाचा निनाद आणि हरी नामाच्या जयघोषानं फुलून गेला आहे. महाराष्ट्र राज्यासह, देशाच्या विविध भागातून निघालेल्या संतांच्या पालख्या काल पंढरपूरजवळ वाखरीत दाखल झाल्या. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील गोल रिंगण आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील उभं रिंगणही काल बाजीराव विहिरीजवळ रंगलं. आज दुपारी वाखरीमधून पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

**बहुडा यात्रा**

ओडिशातील पुरी इथं आज होणाऱ्या बहुडा यात्रेची तयारी जोरात सुरू असून भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांचे तीनही भव्य रथ श्री जगन्नाथ मंदिराकडे  जाण्यासाठी परतीच्या प्रवासासाठी सज्ज  झाले आहेत. आज दुपारी पहांड नावाचा विशेष विधी पूर्ण झाल्यानंतर मिरवणूक सुरू होईल. रथयात्रेच्या या उत्सवात उद्या देवतांना 'सुना बेशा' म्हणजेच सोनेरी पोशाखानं  सजवले जाईल आणि तिन्ही देवतांना दुसऱ्या दिवशी रत्न सिंहासनावर स्थानापन्न करण्यात येईल.

**बुद्धिबळ-गुकेश**

क्रोएशियातील झाग्रेब इथं 2025 च्या ग्रँड चेस टूरच्या रॅपिड अँड ब्लिट्झ स्पर्धेत जेतेपदाचा मान भारतीय  बुद्धीबळपटू  गुकेश डोमराजूनं पटकावला आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत त्यानं  काल  अमेरिकेच्या वेस्ली सोचा पराभव करून रॅपिड सेक्शनवर शिक्कामोर्तब

केलं. गुकेशने 38 चालींमध्ये वेस्लीचा पराभव करून रॅपिड सेक्शनचा सातवा विजय मिळवला. तसंच 18 पैकी 14 गुण मिळवून क्रमवारीमध्ये अव्वल स्थान पटकावलं आहे. पोलंडचा जान-क्रिज्स्टोफ दुडा 11 गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर माजी विश्वविजेता नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन 10 गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. तसंच याच स्पर्धेत सहभागी असलेला भारतीय खेळाडू प्रज्ञानंद रमेशबाबू हा फॅबियानो कारुआनासमवेत नऊ गुणांसह संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे.

**<u>क्रिकेट</u>**

अँडरसन-तेंडुलकर चषकासाठी इंग्लंडमध्ये एजबस्टन इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात कालच्या तिसऱ्या दिवस अखेर भारताला 244 धावांची आघाडी मिळाली आहे. कालचा खेळ संपला तेव्हा भारताच्या 1 गडी बाद 64 धावा झाल्या होत्या. तत्पूर्वी इंग्लंडचा पहिला डाव 407 धावांत आटोपला. भारताकडून महंमद सीराजनं सहा आणि आकाशदीपनं चार बळी घेतले.

**<u>महिला क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंडच्या महिला संघांमध्ये सुरू असलेल्या 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेतील तिसऱ्या सामन्यात काल यजमान इंग्लंडनं भारताचा 5 धावांनी पराभव केला. इंग्लंडनं दिलेल्या 172 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताचा डाव 166 धावांमध्ये आटोपला. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत 2-1नं आघाडीवर आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं आज छत्तीसगड, कर्नाटक किनारपट्टी, पश्चिम बंगाल, गुजरात, राजस्थान आणि हिमाचल प्रदेशात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तराखंडमध्येही आज मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

येत्या सात दिवसांत देशाच्या विविध भागात वादळ, सोसाट्याचे वारे आणि विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. आजपासून दिल्ली एनसीआरमध्येही वादळ, सोसाट्याचे वारे आणि विजांसह पाऊस पडेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार